चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार व चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार- २०२५ तसेच राजकपूर जीवनगौरव पुरस्कार व राजकपूर विशेष योगदान पुरस्कार- २०२५ जाहीर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. मचिम-२०२६/प्र.क्र.३३(भाग ३)/सां.का.१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २९ जुलै, २०२६

<u>वाचा</u> :- १. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्र. मचिम १०९३/१५११९/प्र.१५९/सां.का.१, दि. २८ ऑक्टोबर, १९९३

२. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्र.राकपु १०९८/ प्र.क्र.४९६/ सां.का.२,दि. २८ ऑक्टोबर, १९९३

३. शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. पूरक २०११/ प्र.क्र.१५०/सां.का.४, दि. १३ एप्रिल, २०१२.

४. सहव्यवस्थापकीय संचालक अधिकारी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगांव, मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२५ / म. रा. म.पु/ का. वि/ ११/ ६१, दि. २३ एप्रिल, २०२६

<u>प्रस्तावना :-</u>

उपर्निर्दिष्ट क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये मराठी चित्रपट क्षेत्राच्या उत्कर्षासाठी ज्यांनी दीर्घकाळ आयुष्य समर्पित केले आहे. तसेच चित्रपट सृष्टीत अभिनय, संगीत, निर्मिती, दिग्दर्शन इ. अष्टपैलू गुणांनी त्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली आहे, अशा मान्यवरांना चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार व चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार तसेच राजकपूर जीवनगौरव पुरस्कार व राजकपूर विशेष योगदान पुरस्काराने गौरविण्यात येते. सन २०२५ या वर्षाकरिता विषयांकित पुरस्कार घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०२५ या वर्षीचे चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार व चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार तसेच राजकपूर जीवनगौरव पुरस्कार व राजकपूर विशेष योगदान पुरस्कार खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहेत.

चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार		
अ.क्र.	**वर्ष**	**सन्मानार्थीचे नांव**
१	२०२५	श्री. हृदयनाथ मंगेशकर
चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार		
१	२०२५	श्री. प्रसाद ओक

राजकपूर जीवनगौरव पुरस्कार		
अ.क्र.	**वर्ष**	**सन्मानार्थीचे नांव**
१	२०२५	श्री. सलीम खान
राजकपूर विशेष योगदान पुरस्कार		
१	२०२५	श्रीमती राणी मुखर्जी

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०७२९११४१४८३७४३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUMANT DINKAR PASHTE

Digitally signed by SUMANT DINKAR PASHTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS, 2.5.4.20=58694D4CD2BD16F0AB6514FC8598A9AA217E2508455856A701ADB1BB6EF9B120, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AFC006DAAE95D0F2CF7C7F09CA18CF0C9C9363A05E6070B1C03455CF1CB43586, cn=SUMANT DINKAR PASHTE
Date: 2026.07.29 11:42:54 +05'30'

(सुमंत दि. पाष्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (सां.का.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगांव, मुंबई
४. उप सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. पुरस्कारार्थी व निवड समिती सदस्य (व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, गोरेगाव यांच्यामार्फत)
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
११. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१२. निवड नस्ती, सां.का-१.